# प्रेसनोट

दि.२१/०६/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | बेलवंडी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | ज्ञानेश्वर रावसाहेब पठारे, पोलीस हवालदार, बक्कल नं.२०, वर्ग–३,<br>नेमणुक बेलवंडी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये तडजोडी अंती ४०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार, त्यांची पत्नी, मुलगी व मुलगा यांच्याविरुध्द बेलवंडी पोलीस स्टेशन गुरनं.२०९/२०२३ भा.दं.वि.क.३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दि.१/६/२०२३ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात दि.१२/६/२०२३ रोजी जामीन प्रक्रियेत मदत केली म्हणून व गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी १००००/– रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कार्यालय अहमदनगरकडे तक्रार नोंदविली होती. त्यानुसार.आज दि.२१/६/२०२३ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता यातील आरोपी लोकसेवक ज्ञानेश्वर रावसाहेब पठारे, पोलीस हवालदार, बक्कल नं.२०, वर्ग–३, नेमणुक बेलवंडी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम १००००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ४०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज दि.२१/६/२०२३ रोजी बेलवंडी पोलीस स्टेशन येथे सापळा कारवाई आयोजित केली असता पंचासमक्ष सदर लाच रक्कम ४०००/– रुपये स्वीकारली म्हणुन बेलवंडी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर